।। श्री गणेशाय नम: ।।

।।श्रीराम।।

# मनोगत
# लेखकाचे दोन शब्द

माझ्या जीवनाची सुरुवात माझी 'आई'. आई म्हटले की करुणेची, ममतेची व वात्सल्याची आठवण करुन देते. आई म्हटले की, खऱ्या अनमोल प्रेमाचे एक पवित्र व शुध्द महासागराचे मुळचं होय. आई म्हटले की, पोट भरण्याचे खरे सत्य ठिकाण व साधन. पोट भरल्याशिवाय एखादे सुख दु:ख भोगण्याची ईच्छा होत नाही. जसे एखाद्या भुकेने व्याकुळ असलेल्या माणसाला धनाची व पैशाची पेटी किंवा तिजोरीची किल्ली दिली तरी तो मनापासून स्विकारत नाही पण त्याला जर एखादी शिळी भाकर किंवा भाकरीचा वाळलेला तुकडा दिला तर तो लगेच त्याचा स्विकार करतो व खायला लागतो. असे धनाचे व पैशाचे भंडार आईच्या ममते समोर शुन्य आहेत. आई ही परब्रम्ह रत्नांची खाण आहे. आई एक ईश्वरीय अद्‌भूत शक्ति आहे आपले सर्व सुख दु:ख, गुन्हे, अपराध पोटात घालुन कृपेची अमृतधारा आपल्यावर धरणारी ही फक्त एकमेव आईच आहे. ईश्वरकृपा, संतकृपा, गुरुकृपा होणे हे आई वडिलांच्याच सेवेचे फळ आहे.

आई म्हणजे नरदेह रुपी कामधेनू मायेची, ममतेची व करुणेची पवित्र अथांग महासागर रुपी परमात्मा शक्ति होय. ''स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी'', म्हटले आहे ते सत्य होय. आई ही गार व शांत असा एक कल्पवृक्ष होय एका झाडाखाली जशी गार सावली असते ते झाड पानांनी पूर्णपणे गच्च भरलेले असते त्यामुळे झोप गार व शांत लागते. तशाच प्रकारे आईने आपल्या डोक्यावर व पाठीवर हात फिरवला की, आपण सर्व सुख, दु:ख विसरुन आपल्याला शांत झोप लागते. आईच्या हातामध्ये झोपी घालण्याची जशी गोळीची गुंगी असते ती गुंगी म्हणजे आईचे पवित्र परमशुध्द प्रेमच होय. अशा करुणा, ममता, वात्सल्य परिपूर्ण भरलेल्या त्या मातेचरणी कोटी कोटी दंडवत करुन मी धन्य झालो असे माझे अनुभवाचे दोन शब्द आहेत.

माझ्यावर माझ्या आईने अनुग्रह देऊन मोठ्या कृपारुपी अमृताचा वर्षाव केला आहे. आईने जन्म देऊन एक वेळेस धन्य केले व अनुग्रह देऊन तीच्या चरणाचा अनंतकाळ दास करुन

दुसऱ्या वेळेस धन्य केले म्हणून सांगावेसे वाटते की, अशी आई जगामध्ये धन्य धन्य होय, ''कृतकृत्य झालो, ईच्छा केली ती पावलो.'' असेच म्हणणे योग्य आहे. किती लिहू या परोपकारी आईच्या गाथा. मला अभंग लिहिण्याची बुध्दी देणारी व या 'राम नामाची अमृतधारा', ग्रंथाची रचना करून घेणारी ही माझी कामधेनू रुपी माझी आई गुरुमाता व या जगताचे ईश्वर परमात्मा माझा लाडका देव माझा राम व माझ्या जीवनाचे सार्थक करणारे माझे हनुमान (ब्रह्मचारी) माझे पूर्ण जीवनच होय. सर्व वाचकांना माझे मन: पूर्वक सांगणे हेच आहे की, माझा हा ग्रंथ 'राम नामाची अमृतधारा' सर्वांनी वेळ काढून वाचावा हा ग्रंथ तुम्हाला नक्कीच आवड निर्माण करीन, या ग्रंथासाठी माझे पूर्ण जीवन मी अर्पण करुन मनापासून अभंगांची रचना करून या कलीयुगात तरुन जाण्यासाठी प्रयत्न केला आहे. आपण आपला स्वत: उध्दार करु शकतो हा माझा दृढ विश्वास आहे. कारण ह्या ग्रंथामध्ये मी प्रत्येक अभंग खूप विचार पूर्वक केला आहे. अभंगांची रचना सोप्या मराठी भाषेत आहे. ही भाषा प्रत्येकाला कळावी व साधारण माणूस वाचून आपले जीवन धन्य व सुखी करीन या हेतूने मी हा ग्रंथ लिहिला आहे. माझे अभंग माझ्या श्रीरामाचे महत्व, हनुमंताची भक्ती व राम नामाची शक्ति किती महान, प्रतापी, थोर आहे हे पटवून देतात. राम नाम घेतल्याने माणसावर काय बदल होवून माणसाचा कसा उध्दार होतो व माणूस सत्याकडे कसा वळतो मानवाच्या जीवनामध्ये खरे सुख कशात आहे, माणसाने खरे काय केले पाहिजे, राम नामाने ह्या भवसागरातून अनंत तरुन नेले आहेत असे अनुभव व सत्यता दाखविली आहे. माझे अभंग खूप साधे सोपे आहे. वाचले की लगेच अर्थ लक्षात येतो व आपल्याला राम नामाचे महत्व कळते. हा ग्रंथ लिहितांना मला बरेच अनुभव आले मी जेव्हा अभंग लिहित होतो तेव्हा तेव्हा मला माझ्या मध्ये खूप बदल वाटत गेला व मला राम नामाची इतकी गोडी लागत गेली की, मी मनाचा दृढ निश्चय करून एकच सार काढले, मानवाचे कल्याण फक्त राम नामातच आहे. फक्त रामनामच खऱ्या समाधीचे सुख आहे. माणसाला कीतीही ज्ञान, शिक्षण असले तरी राम नामा विणा सर्व व्यर्थ आहे. कारण मी जेव्हा राम नामाचा जप करून अभंगाला बसतो तेव्हा माझ्या कडून राम नामाच्या शक्तीने आपोआप ही अभंग रचना माझ्या मुखातून बाहेर पडते असा माझा खुप मोठा अनुभव आहे. मी जेव्हा एकान्त जावून बसतो व राम

नामाचा सारखा विचार करुन ते मनापासून चिंतनात ठेवतो तेव्हा मला हे जग किती खोटे व नश्वर आहे. तरी लोकांना का बरे खरे वाटते असे विचार मनाला भावतात. मनाला माझ्या सतत सांगतात की हे जग किती विचित्र आहे. खऱ्याला खोटे व खोट्याला खरे म्हणणारे हे जग नश्वर आहे असा विचार करता करता माझ्या मुखातून एक वाक्य बाहेर पडले ''मुखी राम नामाचा उच्चार । सुखी या जीवनी तो नर ।।'', मी हे वाक्य जेव्हा माझ्या एका वहिच्या पानावर लिहून ठेवले व काही दिवस सारखा विचार करीत होतो मग माझा सर्वात विश्वासाचा व माझ्या जवळ नेहमी राहणारा गुरुसेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे असे मानणारा व मला लिखाणाच्या कामामध्ये मदत करणारा शिष्य 'सचिन विठ्ठल कापसे (सिध्दीनाथ)', त्याने हे वाक्य पाहिले व मला विचारले हे वाक्य काय आहे? मला याचा अर्थ काय आहे ते सांगा? मला हे खूप आश्चर्य वाटले हे वाक्य खरचं मानवाचा उध्दार करणारे वाटत होते. माझ्या डोळ्यात अश्रु आले व मी माझ्या रामाला सांगत होतो, रामा माझ्या प्राणाच्या प्राणेश्वरा! हे माझ्या कडून काय बोलून घेतले खरचं मला कळत नाही रे भगवंता. हे दयेच्या सागरा हे खरचं माझ्या जीवनाचे पुर्ण सार आहे. ''मुखी राम नामाचा उच्चार । सुखी या जीवनी तो नर ।।'' हे वाक्य राम नामाच्या गोड अमृतानेच माझ्या मुखातून बाहेर पडून माझे जीवन धन्य धन्य केले आहे. हे वाक्य म्हणजे सर्व जगतासाठी आहे. ज्याच्या मुखी राम नाम, खरंच त्याचा उध्दार झाल्याशिवाय राहणार नाही व तोच या भवसागरातून तरुन जाणार आहे व जो राम नाम घेतो तोच या जीवनी सुखी असु शकतो. म्हणून मी हे वाक्य एक सत्य सत्य ब्रीदवाक्य आहे असे सर्वांना सांगतो. प्रत्येकाने मुखाने राम नाम घेत राहा या जीवनात सुखी राहाल व परत या जन्म मरणाच्या फेऱ्यातून सुटुन जाल हा आम्हा दोघा गुरु शिष्यांचा संवाद झाला आणि ते वाक्य आम्ही आमच्या आश्रमाचा शिकवणीचा मंत्र आहे हा आम्ही सर्वांनी आमच्या पूर्ण जीवनात आणून जगाला दाखवून दिले आहे.

राम नामाशिवाय या जीवनात सुख नाही. म्हणून राम नाम प्रत्येकाने घेतलेच पाहिजे ''राम नामाची अमृतधारा'' या ग्रंथाला माझ्या राम नामाच्या शक्तीने जन्म दिला आहे. हे माझे ठाम मत आहे. राम नामाची शक्ती अपरंपार आहे. हा ग्रंथ मी खूप मनापासून सर्वांच्या कल्याणासाठी लिहिला आहे व प्रत्येकाने या ग्रंथाचे वाचन करुन खरंच जीवनाचे खरे हित कशात आहे

हे जाणून घ्यावे ही माझी माझ्या सर्व राम सेवकांना विनंती आहे. माझा हा छोटासा प्रयत्न व भक्ती रुपी जनसेवा म्हणून मी या ग्रंथाची रचना केली आहे. हा ग्रंथ म्हणजे माझे आदर्श राम प्रभूच होय, ग्रंथ रुपाने मला तुमच्या अगदी जवळ आणून दिले आहे हे मी माझ्या राम नामच्या शक्तिने, भक्तीने व सेवेने बोलत आहे. काही अक्षर जुळवितांना चुकले असेल तर तुमचे बाळ, सेवक म्हणून मला क्षमा करावी. मी खुप ज्ञानी नाही पण हा ग्रंथ सेवा म्हणून लिहिला आहे. सर्वांनी हा ग्रंथ वाचुन मला याचे समाधान मिळावे व हा ग्रंथ माझा म्हणजे सर्वांचा राम आहे म्हणून सर्वांनी प्रेमाने व श्रध्देने वाचणे व काही चुका असतील तर आम्हाला निश्चित सांगणे.

हे सर्व विश्व त्या परमात्म्याच्या आधिन व त्या ईश्वराच्या आज्ञेनुसार चालते. जगताचा चालक मालक हा माझा रामचंद्र प्रभू आहे. माझ्या श्रीराम परमात्म्याचे वर्णन करु तेवढे कमीच आहे. राम नामाने माणसाच्या मनीचे दोष षड्विकार जळून जातात व नवनवीन चैतन्य निर्माण होवून मानसाचे कल्याण होते. म्हणजेच उद्धार होतो. या मानवाला ईश्वर कधीच लवकर कळत नाही. ईश्वराकडे माणसाचे मन लवकर वळत नाही. साधू संतांनी बऱ्याच भक्ती मार्गांनी ईश्वराची प्राप्ती सांगितली आहे. शास्त्र, वेद, पूराणे ईश्वराकडे जाण्याचा मार्ग नियमाप्रमाणे दाखवतात. सर्वांनी रामनामाचे महत्व पटवून दिले आहे, परंतू त्यामध्ये तुम्ही कोणत्याही भानगडीत न पडता फक्त राम राम म्हणत जरी तुमचे कार्य केले तरी तुम्हाला ईश्वर प्राप्ती होते, सत्याची जाणीव होते राम नामाचे वैभव महत्व तुमच्या लक्षात येईल. राम नामाची शिकवण ही फक्त सद्गुरु चरणातच मिळते परंतू अशा परोपकारी सद्गुरुवर शिष्याची श्रध्दा, भाव, प्रेम, एकनिष्ठा असणे अतिशय गरजेचे आहे. असे परोपकारी संत खूप कमी बघायला मिळतात. कारण प्रत्येक माणूस आपापल्या किर्ती साठी मान सन्मानासाठी, पैशासाठी व खुर्चीसाठी स्वत:चे अस्तित्व विसरुन मोह मायेने वेढून गेलेला दिसत आहे. माणूस पूर्णपणे वासनाधिन, काम, क्रोध, आशा यांच्या मागे वेड्यासारखा धावत आहे मग तो कुणीही असो तो विचार करीत नाही की हे काम केले तर मला कुणी नाव ठेवेल का? हे कृत्य चांगले नाही. हे वाईट कृत्य जर केले तर समाज, देव, धर्म, आपली संस्कृती याला धक्का किंवा कलंक लागेल. आपल्या संस्कृतीला जपण्याच्या मागे कोणीच धावत नाही. तर जो तो आपापले भले कसे होईल, पैसा, धन, संपत्ती कशी मिळवता येईल. यांच्या मागे लागलेला आहे.

आपल्या धर्म नितीला त्याने सरळ सोडून दिले आहे व तो बिनधास्त पणे मोकाट जनावरा सारखा रानमाळ फिरत आहे. म्हणून माझ्या वाचक बंधू भगिनींना माझे अंत:करणा पासून निवेदन व सांगणे आहे की, तुम्ही हा ग्रंथ वाचल्यास माझी माझ्या संस्कृतीविषयी, धर्माविषयी काय तळमळ आहे ती तुमच्या लक्षात येईल.

माझ्या सर्व वाचक बंधूना, राम सेवकांना माझे हेच सांगणे आहे की, हा ग्रंथ वाचतांना मनापासून वाचा म्हणजे त्याचा नक्कीच चांगला अर्थ तुमच्या लक्षात येईल. कारण मला विश्वास आहे की हा ग्रंथ तुम्हाला खूप आवडेल. या ग्रंथामध्ये बरेच काही मी मनमोकळ्या पणाने सांगितले आहे. आपली संस्कृती प्रत्येकाला समजावी. प्रत्येकाने आई वडिल, साधू संत, पोथी ग्रंथ सद्‌गुरु चरणी भाव ठेवून आपले जीवन सार्थक करावे व आपल्या जीवनाला सुंदर आकार देऊन आपआपले जीवन धन्य करावे, म्हणून हा ग्रंथ मी आपल्या सर्वांच्या सेवेसाठी व राम नामाची महती वाढावी, राम नामाची किर्ती सगळीकडे पसरावी, धर्माचा प्रसार व्हावा यासाठी लिहीला आहे. आपल्या सर्वांना राम नामाची गोडी लागो हीच रामाचरणी प्रार्थना करतो. असे धन, पैसा यांच्या अपेक्षेपोटी धावून स्वत:चे नुकसान करुन वेडे झाल्यापेक्षा राम नाम घेवून वेडे झाले ते योग्य वाटेल माझ्या या ग्रंथामध्ये जे काही चांगले विचार व चांगलेपणा मी टाकला आहे तो तुम्ही निश्‍चित जाणाल. या ग्रंथासाठी माझे आवडते शिष्य दोघे जण यांचे खूप अनमोल श्रमदान आहे. मला त्यांनी अभंग लिहण्यापासून अक्षर जुळणी व प्रकाशनापर्यंत मदत केली आहे ते माझे शिष्य मनापासून ईश्‍वरनिष्ठा, गुरुनिष्ठा जपतात.

’सचिन विठ्ठल कापसे (सिध्दीनाथ)’ व दुसरा शिष्य ’समीर अशोक पेरकर(सुदर्शन)’ या दोनही मुलांनी मला मोलाचे सहकार्य केले आहे. माझे श्रध्दास्थान ह.भ.प.प्रभाकर महाराज खैरनार (पाळेकर) यांनी सुध्दा अभंग वाचणे, यमक जुळवणे अशा प्रकारचे मार्गदर्शन केले म्हणून हा ग्रंथ मी पूर्ण करु शकलो. तसेच ग्रंथाच्या छपाईसाठी नाशिकचे ’आकृती आर्टस्’ यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल धन्यवाद देतो व त्यांचा आभारी आहे. त्यांना श्रीराम प्रभूच आशीर्वाद देतील हा माझा दृढ विश्‍वास आहे. त्यांनी आम्हाला असेच पुढेही सहकार्य करावे हीच त्यांच्याकडे अपेक्षा करतो.

सर्व वाचक बंधू भगिनींना व राम सेवकांना विनंती करतो तुम्ही हा ग्रंथ वाचल्यानंतर काही चुका असतील तर आम्हाला जरुर कळवणे, आम्ही त्याचा जरुर स्विकार करु. ''राम नामाची अमृतधारा'', हा ग्रंथ मी श्रीराम चरणी अर्पण करून परत एकदा सर्वांची क्षमा मागतो. हा ग्रंथ जरुर वाचावा व संग्रहीत ठेवावा.

**।। अभंग ।।**

**रामा करितो मी हट्ट एक । तुम्ही व्हावे रामा प्रकाशक ।।१।।**
**रामा लिहुनिया अक्षरं दोन । त्यामध्ये साक्षात माझे राम रमण ।।२।।**
**कोणी करो काही रे विचार । रामा मी वाहिलं तुझ्या चरणी सारं ।।३।।**
**शब्द अक्षर जोडिले तुला विचारुनी । रामा तुझ्याच कृपेची ही शुध्द वाणी ।।४।।**
**हनुमंतदास म्हणे तुच साक्षी एक । माझा राम रे रघूनायक ।।५।।**

तुमचे गुरुदेव

।। जय श्रीराम ।।